महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०६१५/सीआर-१२/२०२०/तीन

# घोषणा

**विषय:-** सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० - उमेदवारांच्या बैठकव्यवस्थेबाबत

सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० करीता दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन (जाहिरात क्रमांक ०२/२०२०) विषयांकित पूर्व परीक्षा औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे अशा चार जिल्हाकेंद्रावर घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अपेक्षेपेक्षा जादा उमेदवारांच्या अर्जांची संख्या, पुणे जिल्हाकेंद्रावरील उमेदवारांच्या बैठकव्यवस्थेकरीता दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजीच्या घोषणेद्वारे निश्चित करण्यात आलेली कमाल मर्यादा, परीक्षा सुरळितपणे आयोजित करण्याकरीता कराव्या लागणा-या विविध उपाययोजना, प्रशासकीय यंत्रणेवरील ताण, इत्यादी बाबी लक्षात घेता जाहिरातीद्वारे प्रस्तावित केल्यानुसार फक्त ४ जिल्हाकेंद्रावर पूर्व परीक्षा घेण्याऐवजी प्रशासकीय कारणास्तव औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या जिल्हाकेंद्रांसह अमरावती व नाशिक अशा एकूण ६ महसुली मुख्यालय असलेल्या जिल्हाकेंद्रावर परीक्षा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**२.** वरील निर्णयाच्या अनुषंगाने विषयांकित परीक्षेकरीता जाहिरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या उमेदवारांच्या बैठकव्यवस्थेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे :-

**२.१** उमेदवारांच्या अर्जामधील पत्रव्यवहाराच्या पत्त्यामध्ये अमरावती अथवा नाशिक या प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा नमूद असलेल्या सर्व उमेदवारांना (अहमदनगर जिल्हा वगळून) त्यांच्या महसुली मुख्यालयाच्या आधारे अमरावती अथवा नाशिक जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

**२.२** अर्जामधील पत्रव्यवहाराच्या पत्त्यामध्ये फक्त अहमदनगर जिल्हा नमूद असलेल्या उमेदवारांना औरंगाबाद जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

**२.३** उर्वरित उमेदवारांपैकी प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर करताना पुणे जिल्हाकेंद्रांची निवड केलेल्या उमेदवारांच्या अर्जामधील पत्रव्यवहाराच्या पत्त्यामध्ये पुणे महसुली विभागाच्या अखत्यारीतील जिल्ह्याऐवजी अन्य जिल्हा नमूद असल्यास त्यांना अर्जामधील पत्रव्यवहाराच्या पत्त्यामध्ये नमूद जिल्ह्यानुसार मुंबई, औरंगाबाद अथवा नागपूर या महसुली मुख्यालय असलेल्या संबंधित जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

**३.** उपरोक्त व्यवस्थेनुसार प्रवेश दिलेल्या पात्र उमेदवारांना त्यांची प्रवेशप्रमाणपत्रे परीक्षेपूर्वी साधारणपणे ७ दिवस अगोदर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवरील उमेदवारांच्या खात्यामध्ये (प्रोफाईल) उपलब्ध करुन देण्यात येतील.

**४.** वरील व्यवस्थेमध्ये बदल करण्याबाबत उमेदवारांकडून प्राप्त होणारी विनंती कोणत्याही कारणास्तव तसेच कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही. त्यानुसार उमेदवारांनी परीक्षेचे पूर्व नियोजन करावे.

ठिकाण:- मुंबई
दिनांक:- १२ फेब्रुवारी, २०२०

उपसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग